मुंबई विद्यापीठ
दूर व मुक्त अध्ययन संस्था

University of Mumbai
INSTITUTE OF DISTANCE AND OPEN LEARNING

Estd. 1971

"श्रेष्ठत्व-सक्षम विद्यापीठ" "University with Potential for Excellence"

दू.व.मु.अ. संस्था/4893/२०१५.
दिनांक : 09/02/२०१५.

प्रति,
सर्व प्राचार्य
मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व,
कला/वाणिज्य/विज्ञान महाविद्यालये.

विषय : आपल्या महाविद्यालयातुन (IDOL) दुर व मुक्त अध्ययन संस्थेमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची ट्रान्सफर सर्टीफीकेट सिलबंद लिफाफ्यामधुन पाठविणेबाबत.

महोदय/महोदया,

दूर व मुक्त अध्ययन संस्थेमध्ये दरवर्षी साधारणत: ८०,000 पेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश घेतात. संस्थेमध्ये महाऑनलाईन च्या माध्यमातुन ऑनलाईन प्रवेश प्रक्रीया राबविण्यात येते.

IDOL मधुन आपल्या महाविद्यालयात प्रवेश घेताना किंवा आपल्या महाविद्यालयातुन IDOL मध्ये प्रवेश घेताना ट्रान्सफर सर्टीफीकेट ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याबाबतची प्रक्रीया सूरू आहे. परंतु ऑनलाईन पध्दतीने ट्रान्सफर सर्टीफीकेट स्विकारण्याची प्रक्रीया सूरू होई पर्यंत आपल्या महाविद्यालयातुन प्रथम वर्ष किंवा व्दितीय वर्ष (B.A/B.Com/B.Sc.)उत्तीर्ण झाल्यावर कोणत्याही विद्यार्थ्यांनी IDOL मध्ये व्दितीय/तृतीय वर्ष (B.A/B.Com/B.Sc.) मध्ये प्रवेश घेतल्यास अशा विद्यार्थ्याचे ट्रान्सफर सर्टीफीकेट IDOL मध्ये पाठवतांना सिलबंद लिफाफ्यात मुळपत्रासह प्राध्यापक-नि-संचालक किंवा उपकुलसचिव (प्रशासन) यांना पाठविण्यात यावे. त्याचप्रमाणे IDOL मधुन आपल्या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याची T.C IDOL तर्फे बंद लिफाफ्यात मुळपत्रासह रजिस्टर पोष्टाने/स्पीड पोष्टाने पाठविण्यात येत. या शिवाय सदर लिफाफा बंद करून IDOL दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या गोल शिक्यासह आपल्या महाविद्यालयात पाठवण्यात येईल.

सुरक्षिततेच्या दृष्टीने अशी महत्वाची कागदपत्रे शक्यतो विद्यार्थ्याच्या हस्ते पाठवू नयेत; परंतु अपवादात्मक परिस्थीतीत विद्यार्थ्याच्या हस्ते पाठविणे अपरिहार्य असल्यास विद्यार्थ्याचे ओळखपत्र तपासुन लिफाफ्यात रितसर सिलबंद करूनच पाठवावे व त्याची रितसर पोचपावती घ्यावी.

आपला विश्वासु

(दिनेश कांबळे)
उप-कुलसचिव
प्रशासन
Emai:kamble_dinesh2005@rediffmail.com